MHSN150011142023

( शांताबाई धोंडीराम कदम विरुध्द आप्पासाो यशवंत भोसले-२ )

---

## विशेष दिवाणी दावा क्रमांक १०४/२०२३ मधील निशाणी ३२ खालील आदेश

१. प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ अन्वये मूळ दाव्यामध्ये आवश्यक दुरुस्ती करणेकरीता दाखल करण्यात आलेला आहे.

२. प्रतिवादी क्रमांक २ व ३ यांनी म्हणणे दाखल केले असून, अर्ज नामंजूर करणेबाबत विनंती केली आहे. वैकल्पिकरित्या प्रतिवादी क्रमांक २ व ३ यांनी अर्ज खर्चासह मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

३. अर्ज आणि प्रतिवादीं क्रमांक २ व ३ तर्फे दाखल म्हणणे यांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादींतर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

४. वादी व प्रतिवादी क्रमांक २ व ३ यांच्या कथनांवरुन खालील मुद्दे विचारार्थ निघाले आहेत. सदरचे मुद्दे आणि त्यावरील निष्कर्ष कारणमीमांसेसहीत खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी मागणी करतात त्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती आवश्यक आहे | होय. |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

# कारणमीमांसा

मुद्दा क्रमांक १ आणि २ बाबतः-

५. वादी हिचे असे कथन आहे की, प्रस्तुत अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे मूळ दाव्यामध्ये नजरचुकीने काही सांख्यिक व शाब्दिक चुका झालेल्या आहेत. वादी हिचे कथनाप्रमाणे मूळ दाव्यातील परिच्छेद क्रमांक ६ मधील तिस-या ओळीमध्ये 'खरेदी दस्त क्र.१५७०/२०१८' ऐवजी 'खरेदी दस्त क्र.१५१७/२०१८' आणि मूळ दावा परिच्छेद क्रमांक १०/अ मधील दुस-या ओळीमध्ये 'प्रतिवादी नं.१ व २' ऐवजी 'वादी व प्रतिवादी क्र.१' अशी दुरुस्ती करणेबाबत परवानगी मागितलेली आहे.

६. वादी याने दाव्यासोबत यादी निशाणी ३ अनुक्रमांक ६ येथे नोंदणीकृत खरेदीपत्राची सत्यापित प्रत दाखल केलेली आहे. सदर खरेदीपत्राचे अवलोकन केले असता, सदर खरेदीपत्र हे वादी व प्रतिवादी क्रमांक १ यांचे दरम्यान झाले असून त्याचा दस्त क्रमांक १५१७/२०१८ असा नमूद आहे.

७. वादी हिने वादातील खरेदीपत्रा हे बनावट व बेकायदेशीर असून ते रद्द होऊन मिळणेकरीता प्रस्तुत दावा दाखल केलेला आहे. वादी हिचे दाव्यातील कथने, अभिलेखावरील कागदपत्रे व प्रतिवादी क्रमांक २ व ३ यांचे हरकतीचा विचार करता, वादातील खरेदीपत्राचा योग्य नोंदणी क्रमांक व खरेदीपत्राच्या अनुषंगाने वस्तुस्थिती अभिलेखावर येणे आवश्यक आहे. प्रस्तावित दुरुस्ती ही प्रस्तुत प्रकरणाची गुणदोषावर सुनावणी होऊन अंतिमरित्या निर्णयित होण्याकरीता आवश्यक आहे. नियोजित दुरुस्ती मंजूर केल्यास दाव्याचा तपशील अथवा दाव्याचे स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. प्रस्तुत अर्ज मंजूर केलेस प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास प्रकरणांची संख्या वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

८. अद्याप प्रस्तुत प्रकरणामध्ये वादीतर्फे पुरावा नोंदविण्यात आलेला नाही अथवा प्रस्तुत प्रकरणामध्ये अद्याप प्रभावी/परिणामकारक सुनावणी प्रक्रियेस प्रारंभ झाला नाही. तसेच प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांचे विरुध्द तुर्तातूर्त मनाई अर्ज प्रलंबित आहे. प्रतिवादी यांना प्रस्तुत दुरुस्तीच्या अनुषंगाने आवश्यक असल्यास जादा कैफियत दाखल करण्याची संधी आहे. त्यामुळे प्रस्तुत दावा गुणदोषावर अंतिम निर्णयित करण्यासाठी, प्रस्तुत अर्जामध्ये मागणी केलेली दुरुस्ती आवश्यक असल्याचे दिसुन येते. सदर दुरुस्ती मंजूर न केल्यास वादी हिचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. सबब, मी मुद्दा क्रमांक १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवून मुद्दा क्रमांक २ चे उत्तरासाठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहेत.

२. वादी हिने अर्जात मागणी केल्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करावी व न्यायालयाकरीता व प्रतिवादी यांना दुरुस्त दाव्याची प्रत पुरवावी.

SHINDE SUDHIR NARHARIRAO
Digitally signed by SHINDE SUDHIR NARHARIRAO
Date: 2024.03.13 17:38:24 +0530

विटा.
दिनांकः- ११/०३/२०२४.

(सुधीर न. शिंदे)
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, विटा.

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

Name of the Stenographer : S. P. Pethkar.
Court : Jt. Civil Judge Senior Division, Vita.
Judgment/Order signed by the Presiding Officer on : 11/03/2024.
Judgment/Order uploaded on : 16/03/2024.